दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे   संपादक : बंडूभाऊ इंगोले   RNI No - MHMUL/25/A0788
■ वाशीम ■ शुक्रवार, २७ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : ३२० ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# २०२७ ची जनगणना डिजिटल असणार; सर्व कामं मोबाईल फोनद्वारे केली जाणार

महाराष्ट्र जीत

**नवी दिल्ली :** जनगणना 2027 पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. याचे केंद्रबिंदू जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) नावाचे एक डिजिटल पोर्टल असेल. भारताचे रजिस्ट्रार जनरल (RGI) यांनी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना माहिती दिली आहे की, जनगणना 2027 च्या हालचालींचा प्रत्यक्ष वेळेवर मागोवा घेण्यासाठी जनगणना व्यवस्थापन आणि देखरेख प्रणाली (CMMS) तयार करण्यात आलीय. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना पाठवलेल्या परिपत्रकात भारताचे रजिस्ट्रार जनरल मृत्युंजय कुमार नारायण यांनी सांगितले की, येत्या जनगणना 2027 मध्ये डेटा संकलन आणि प्रसाराची गुणवत्ता, कार्यक्षमता आणि वेळेवर सुधारणा करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाणार आहे.डेटा डिजिटल पद्धतीने गोळा केला जाणार : त्यांनी पुढे सांगितले की, आगामी जनगणनेत, डेटा डिजिटल पद्धतीने गोळा केला जाणार आहे, जो जनगणना प्रक्रियेच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक प्रमुख आणि परिवर्तनकारी पाऊल असेल. डेटा संकलनासाठी किमान 3.2 दशलक्ष फील्ड कामगार तैनात केले जातील. डिजिटल स्वरूप



पारंपारिक कागद-आधारित पद्धतींची जागा घेणार आहे, ज्यामध्ये संपूर्ण प्रक्रिया व्यवस्थापित करण्यासाठी हाताने चालणारी उपकरणे, जिओ-टॅगिंग आणि केंद्रीकृत वेब प्लॅटफॉर्मचा वापर केला जाणार आहे. सीएमएमएस प्रणालीमध्ये एक वेब-आधारित मॅपिंग ॲप्लिकेशन समाविष्ट आहे, जे घरांची यादी ब्लॉक्स (एचएलबी) आणि एन्युमरेशन ब्लॉक्स (ईबी) चे अचूक जिओ-टॅगिंग करण्यास अनुमती देते, ज्यामुळे डेटा ओव्हरलॅप आणि वगळणे कमी होते.

दुर्गम भागात सप्टेंबर 2026 मध्ये जनगणना केली जाणार : जनगणनेच्या कामकाजाशी परिचित असलेल्या सूत्रांनी ईटीव्ही भारतला सांगितले की, अचूक डेटा संकलनासाठी सीएमएमएस पोर्टलवर 600,000 हून अधिक एकात्मिक भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) नकाशे (जिल्हा/उप-जिल्हा/गाव पातळी) आधीच अपलोड केले गेलेत. गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी यापूर्वी संसदेत सांगितले होते की, 2027 ची जनगणना डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे. त्यांनी सांगितले की, डेटा संकलन मोबाइल ॲपद्वारे केले जाणार आहे आणि स्व-मोजणीसाठी ऑनलाइन व्यवस्था देखील असेल. संपूर्ण प्रक्रियेचे निरीक्षण वेब पोर्टलद्वारे केले जाणार आहे.

---

## एकता व विश्वास या मुल्यानेच भारतात सुवर्णम युग येईल – राष्ट्रपती द्रोपदी मूर्म

महाराष्ट्र जीत

**नकूल उपाध्ये /कारंजा :** एकता व विश्वास या मुल्याचे आधारे भारतात सुवर्णम युग येईल . यालाच भारत विश्व गुरु किवा विकसीत भारत म्हणेलअसे प्रतीपादन देशाच्या महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मूर्म यांनी राज्य स्तरीय अभीयांनाचा शुभारंभ करते वेळी ब्रम्हा कुमारीज कडून आयोजीत कार्यक्रमात नागपूर येथे दि२५ फेब्रुवारी रोजी केले .

पुढे बोलतांन महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मूर्म म्हणाल्या की ब्रम्हा कुमारीज ९० वर्षा पासून अच्छाई साठी काम करीत आहे . ब्रम्हा कुमारीज महीला डोक्यावर कलश घेऊन तर भाईजन ब्रम्हा कुमारीजचा झेंडा घेवून गाव खेड्यातील हर व्यक्ती पर्यन्त अच्छाई साठी काम करीत आहे . एकता विश्वास पवित्रताचे सहाय्याने भारत जगाचा विश्वगुरु बनून शांतीचा संदेश देत आहे .




सतयुगात वाघ बकरी सोबत पाणी पीत होती असे म्हणतात तो काळ आता लवकर जवळ येत आहे . याकरीता सकारात्मक विचार आवश्यक आहेत . सकारात्मक विचार भगवान पसंद करतात तेव्हा एकता विश्वास यामुळे स्वर्णम युग निश्चीत येणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले . ब्रम्हा कुमारीज दिदिच्या डोक्यावर कलश देत तर ब्रम्हा भाई लोकांच्या खांद्यावर ब्रम्हा कुमारीजचा झेंडा देत महामहीम राष्ट्रपतीनी वातावरणात उमंग उत्साह भरला .

व्यासपीठावर महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मूर्म; राज्यपाल आचार्य देवव्रतजी; राज्याचे महसूल मंत्री ना .चंद्रशेखर बावनकुळे; नागपूर ब्रम्हा कुमारीज केंद्राच्या संचालिक राजयोगी रजनी दिदि ; माऊन्ट अबूच्या चंद्रकला दिदि; बीके मृत्युंजय भाई;अमरावती केंद्राच्या केंद्र संचालिका राजयोगी सिता दिदि; अकोल्याच्या बीके रुखमिनी दिदि; मंगला दिदि; आशा दिदि व्यासपीठावर विराजीत होत्या .

अत्यंत सुरेख चैतन्य वर्धक कार्यक्रमाची सुरवात सुंदर नृत्यानी झाली उपस्थीतांचे स्वागत ब्रम्हा कुमारीज नागपूर द्वारा करण्यात आले .कार्यक्रमाला ब्रम्हा मुख वंशावली परीवार मोठ्या संख्येने उपस्थीत होता .

## नगर परिषदेचे सर्व विभाग आता एकाच छताखाली
### दुसऱ्या सर्वसाधारण सभेत २९ ठरावांना एकमताने मंजुरी




महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी अब्दुल जुबेर कारंजा :** कारंजा नगर परिषदेची दुसरी सर्वसाधारण सभा २६ फेब्रुवारी रोजी नगराध्यक्ष फरिदाबानू पुंजाणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत नगर परिषदेचे विविध विभाग सध्या वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असल्यामुळे नागरिकांना होत असलेली गैरसोय लक्षात घेता सर्व विभागांचे कामकाज एकाच इमारतीत सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. या ठरावासह विविध विकासकामे व नागरी सुविधा पुरविण्यासंदर्भातील एकूण २९ ठरावांना बिनविरोध मंजुरी देण्यात आली.

नगराध्यक्षांच्या दालनात आयोजित या सभेत त्यांच्या परवानगीने उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले यांनी सर्व ठरावांचे वाचन केले. सभेत मंजूर झालेल्या ठरावांमध्ये श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज संस्थानला 'अ' दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करणे, महापुरुषांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यांची रंगरंगोटी व स्वच्छता करणे, नगर परिषदेच्या शाळेत अंगणवाडी केंद्र सुरू करणे, हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम कब्रस्तानाच्या विकासासाठी निधी मागणी करणे, लेआउटमधील ओपन स्पेसवर ओपन जिम उभारणे, सांडपाण्यासाठी भुयारी गटार योजना राबविणे, वाढ क्षेत्रासाठी शासनाकडे निधीची मागणी करणे, वसाहतींचे सर्वेक्षण करून आवश्यक ठिकाणी पथदिवे बसविणे, सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणाऱ्या बॅनरसाठी दर निश्चित करणे आदी मुद्द्यांचा समावेश होता. एमआयएम पक्षाचे सत्ताधारी तसेच भारतीय जनता पक्षाच्या विरोधी गटातील नगरसेवकांनी सर्व ठरावांना एकमताने मंजुरी दिली. सभेला एमआयएम पक्षाचे गटनेते बिलाल पुंजाणी , भाजपच्या गटनेत्या शालिनीताई ठाकरे यांच्यासह एमआयएमचे १८, भाजपचे १४, राष्ट्रवादी काँग्रेसचे १ व १ अपक्ष नगरसेवक उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी अभिषेक परदेशी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. राष्ट्रगीताने सभेची सुरुवात झाली. तर महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून सभेची सांगता करण्यात आली.

---

## गावातील स्वच्छता सुविधा शाश्वत राखण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा
### मुख्य कार्यकारी अधिकार अर्पित चौहान यांचे प्रतिपादन

महाराष्ट्र जीत

**वाशिम (प्रतिनिधी) :** शेग्रीगेशन शेड अर्थात कचरा विलगीकरण केंद्र,सार्वजनिक शौचालय, घंटागाडी सार्वजनिक, कचरा कुंड्या इत्यादी सुविधा ग्राम पंचायत स्तरावर उपलब्ध असुन त्याच्या शाश्वततेसाठी गावातील महिलांनी पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकार अर्पित चौहान यांनी (दि.24) स्थानिक गुलाटी हॉटेल मध्ये आयोजित कार्यशाळेत केले.स्वच्छ भारत मिशन टप्पा-2 अंतर्गत कचऱ्याचे विलगीकरण सार्वजनिक स्वच्छता आणि वर्तणूक बदल घडविणे बाबत दोन दिवशी प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमात सीईओ चौहान यांनी महिलांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील एएफसी इंडिया लिमिटेड संस्थेचे राज्य समन्वयक केशव घीगे, क्षमता बांधणे तज्ञ प्रफुल्ल काळे, मनुष्यबळ विकास सल्लागार शंकर आंबेकर आणि जनसंपर्क अधिकारी राम श्रृंगारे यांची उपस्थिती होती.

सीईओ चौहान म्हणाले बचत गटातील महिलांनी पारंपारिक व्यवसायाच्या चाकोरीतून बाहेर येऊ नाविन्यपूर्ण व्यवसायात उतरावे. शासनाच्या वतीने तालुक्यातील एका गावामध्ये प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात आला सक्षम बचत गटांनी हा प्रकल्प चालवण्यासाठी पुढाकार



घ्यावा. जिल्हा परिषद अशा बचत गटांना प्राधान्य देईल अशी आश्वासन दिले.स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत ए एफ सी इंडिया लिमिटेड नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी प्रविण प्रशिक्षक म्हणुन विलास भालेराव, प्रविण पट्टेबहादुर आणि प्रभु कांबळे हे प्रशिणार्थींना मार्गदर्शन करीत आहेत कार्यशाळेत वाशिम तालुक्यातील महिलांनी सहभाग घेतला होता. समारोपीय कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थी महिलांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्ष आणि जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांच्या समन्वयातून ए. एफ. सी. इंडिया लिमिटेड नवी दिल्ली या संस्थेच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रत्येक ग्राम पंचायतीतधुन 3 महिला प्रतिनिधींना या कार्यशाळेला आमंत्रित करण्यात आले आहे. वाशिम जिल्ह्यातील 491 ग्राम पंचायती मधील एकूण 1473 महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. दि.२१ फेब्रुवारी पासून सुरू झालेले हे प्रशिक्षण १७ मार्च पर्यंत चालणार असल्याची माहिती क्षमता बांधणी सल्लागार प्रफुल्ल काळे यांनी दिली.

## पुरंदर –हवेलीचे माजी आमदार श्री संजयजी जगताप सर यांची महाराष्ट्र प्रदेश चिटणीस पदी निवड

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप :** झाल्याबद्दल मध्य हवेली मांडलाच्या वतीने आंबेगाव खुर्द येथे सत्कार करण्यात आला यावेळी प्रस्तावना भाजपा मध्य हवेली मंडल उपाध्यक्ष श्री अनंत गोरोबा माने यांनी केली आणि भाजपा पुणे दक्षिण जिल्हा सरचिटणीस श्री बाळासाहेब गरुड यांनी शुभेच्छा देताना दक्षिण पुण्याला एक चांगल्या प्रकारचे प्रबळ नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त केली सरामुळे पक्ष वाढीस मदत होईल अशी भावना व्यक्त केली. महाराष्ट्र प्रदेश कामगार मोर्चा सचिव श्री नितीन जांभळे यांनी शुभेच्छा दिल्या मंडलातील सर्व कार्यकर्त्यांनी सरांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या... या सत्कार प्रसंगी बोलताना श्री संजयजी जगताप सर यांनी सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची इच्छा व्यक्त केली भारतीय जनता पार्टी हा पक्ष कार्यकर्त्याचा पक्ष आहे तळागाळातील लोकांना सोबत



घेऊन आपण काम करणार असून आपल्या भागात संघटन मजबूत करणार असल्याची ग्वाही या निमित्ताने दिली..या सत्कार समारंभाला श्री मंगेश जाधव, भाजपा फुरसुंगी मंडल सरचिटणीस श्री सागर खुटवड ,फुरसुंगी मंडलाचे श्री कैलास शेवाळे ,श्री महेश किवडे, श्री अभिजितदादा कदम, श्री मयुर कोंढरे, श्री नीलेश कोंढरे, महिला आघाडी सचिव सौ प्रेरणा काळबांडे सौ रुपाली अनंत माने,श्री अमित काळबांडे, श्री संदीप शिरोळे, श्री सतीश नाना जगताप, श्री आप्पा मारणे, व्यापारी आघाडी प्रमुख श्री वैभव ढेकाने,श्री बाळकृष्ण वाडेकर श्री दिनेश गंगावणे, श्री संदीप जाधव, श्री बालदेवसिंग पवार श्री शंभू सतीश जगताप या सत्कार समारंभाला या भागातील सर्व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

दैनिक महाराष्ट्र जीत


## संपादकीय

### आत्ममग्नतेत हरवलेले नेतृत्व

खेळाडूंची कामगिरी असो वा लष्कराचा पराक्रम—तो आपल्या नेतृत्वाचा परिणाम असल्याचा आव आणण्याची सवय जडलेल्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यंदाच्या वार्षिक भाषणात ठोस धोरणात्मक दिशा न देता विरोधकांवरच प्रामुख्याने प्रहार केला. आत्मप्रौढीच्या नादात वास्तवाचा विसर पडला की नेतृत्वाची धार बोथट होते, याचेच हे उदाहरण म्हणावे लागेल.

अमेरिकेतील 'स्टेट ऑफ द युनियन' ही परंपरा—ज्यात अध्यक्ष सेनेट आणि हाउस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज यांच्या संयुक्त बैठकीसमोर देशाची स्थिती, आव्हाने आणि उपाययोजना यांचा आढावा मांडतात—लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. या प्रसंगी न्यायव्यवस्थेतील मान्यवर उपस्थित असतात आणि भाषणानंतर विरोधी पक्ष अधिकृत प्रतिक्रिया देतो. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील हे भाषण विशेष ठरण्याची तीन कारणे होती: गेल्या वर्षी सत्ताग्रहणानंतर त्यांना पुरेसा कालावधी मिळाला नव्हता; सर्वोच्च न्यायालयाकडून नुकताच त्यांना धक्का बसला होता; आणि नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या मध्यावधी निवडणुका डोळ्यासमोर होत्या. त्या निवडणुकांत सेनेटमधील ४५ आणि प्रतिनिधीगृहातील ४३५ जागांसाठी मतदान होणार आहे. किमान एका सभागृहात तरी पराभवाची शक्यता व्यक्त होत असताना, या भाषणातून निवडणुकीचे रणशिंग फुंकणे स्वाभाविकच होते. तब्बल एक तास ४७ मिनिटांच्या या प्रदीर्घ भाषणातून ट्रम्प यांनी तेच साधले.

मात्र अपेक्षा होती ती अर्थकारण, रोजगार, परराष्ट्रनीती अशा महत्त्वाच्या विषयांवरील स्पष्ट दिशादर्शक विधानांची. त्याऐवजी डेमॉक्रॅटिक पक्षावर टीकेची सरबत्ती करण्यातच वेळ गेला. अलीकडे डेमॉक्रॅट्स 'परवडण्याजोगेपणा'—ॲफोर्डिबिलिटी—हा मुद्दा पुढे रेटत आहेत. अन्नधान्याचे दर, घरांची किंमत, प्रवासखर्च, वेतनवाढ, रोजगारनिर्मिती—प्रत्येक बाब नागरिकांना परवडते का, हा प्रश्न ते सातत्याने विचारत आहेत. या मुद्द्याला प्रतिसाद मिळू लागल्याने ट्रम्प अस्वस्थ झाल्याचे त्यांच्या भाषणातून जाणवले. डेमॉक्रॅट्सचा हा 'नवा फंडा' असल्याची टीका करताना त्यांनी त्याच मुद्द्याला अधिक प्रसिद्धी मिळवून दिली, हे त्यांच्या लक्षात आले नसावे.

आर्थिक प्रश्नांबरोबरच स्थलांतराचा मुद्दा तापवण्याचा प्रयत्नही त्यांनी केला. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विषय राजकीय दृष्ट्या उपयोगी पडेल, याची त्यांना जाणीव आहे. परंतु राष्ट्रीय अभिभाषणाच्या व्यासपीठावर तोच सूर आळवणे कितपत सयुक्तिक, हा प्रश्न उरतो. अलीकडील सर्वेक्षणांनुसार ट्रम्प यांच्या कामगिरीबाबत समाधान व्यक्त करणाऱ्यांची टक्केवारी ३०-३२ च्या आसपास घसरली आहे. या पार्श्वभूमीवर व्यापक आर्थिक आराखडा मांडण्याची गरज असताना, त्यांनी विरोधकांच्या उणिवा अधोरेखित करण्यावर भर दिला.

दूरचित्रवाणीवरील व्यक्तिमत्त्व म्हणून 'दृश्य परिणाम' किती महत्त्वाचा असतो, याची ट्रम्प यांना जाणीव आहे. त्यामुळे भाषणात आशय कमी पडू लागला की रंगत वाढवण्याचे तंत्र त्यांनी वापरले. बर्फावरील हॉकी स्पर्धेतील विजेत्या संघाला विशेष आमंत्रण देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले आणि आपल्या धोरणांमुळेच हा विजय शक्य झाल्याचा सूचक दावा करण्यात आला. त्यात अतिरेकाची छटा होती. त्याचप्रमाणे काही लष्करी अधिकाऱ्यांना बोलावून त्यांचा सन्मान जाहीर करण्यात आला; त्यांच्या जखमांचे भावनिक वर्णन करून राष्ट्रभावना चेतवण्याचा प्रयत्न झाला. परंतु हे प्रयत्न अधिक नाटकी भासले.

न्यायालयीन निर्णयामुळे निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर सभागृहात उपस्थित असलेल्या न्यायाधीशांविषयी संयम राखला गेला, ही बाब उल्लेखनीय म्हणावी लागेल. आयातशुल्कावरील निकालावर त्यांनी केवळ नाराजी व्यक्त केली; पूर्वी वापरलेली आक्रमक भाषा टाळली. तथापि ती सभ्यता त्यांनी डेमॉक्रॅट्सवर टीकेचा वर्षाव करून भरून काढली.

# हौसिंग सोसायट्यावरील प्रशासक हटले,समितीच्या निवडणूकांची प्रक्रिया सुरु

## आर्थिक व्यवहारांची चौकशी होणार

महाराष्ट्र जीत

**नवी मुंबई,(केतन भोज) :**नवी मुंबईतील २०० सहकारी गृहनिर्माण संस्थेवरील प्रशासकराज संपवा यासाठी सहकार संवर्धन समिती व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ यांनी नवी मुंबईत सीबीडी बेलापूर येथे २३ फेब्रुवारी पासून साखळी उपोषण सुरू केलेले होते. या आंदोलनाची दखल घेत बहुतेक मागण्या मान्य झाल्या आहेत.तसे लेखी पत्र सहकार सहनिबंधक सिडको श्री.राजेंद्र वीर यांनी आंदोलनकर्ते सुभाष बसवेकर यांना दिले आहे.नवी मुंबई सिडको कार्यक्षेत्रातील सुमारे २०३ सहकारी गृहनिर्माण संस्थावर गेल्या तीन वर्षा पासून प्रशासक बसविले गेले होते. त्यातील बहुतेक प्रशासकांची कायदेशीर मुदत संपूनही ते त्या ठिकाणी बेकायदा कार्यरत होते.एकूण २०३ सहकारी सोसायट्यापैकी ७६ संस्था च्या निवडणूका पार पडलेल्या असून उवरीत पैकी ७२ संस्थावर निवडणूक अधिकारी नियुक्त करून निवडणूकीची प्रक्रिया सुरू झालेली आहे.उर्वरीत दप्तर ताबा अप्राप्त असणाऱ्या ३१ संस्थाच्या दप्तरांचा ताबा घेऊन तेथील कामकाज सुरळीत करण्यात येईल.बाकी राहिलेल्या २४ संस्थापैकी १९ संस्थावर निवडणूक अधिकारी नियुक्तीची प्रक्रिया सुरू आहे. आता उरलेल्या केवळ पाच सहकारी गृहनिर्माण संस्थावर प्रशासक असून त्यांनाही लवकरच बाजूला करून तेथे ही शीघ्र तितक्या लवकर लोकशाही पद्धतीने निवडणूका



घेतल्या जाणार आहेत.अशी लेखी माहिती सह निबंधक सहकारी संस्था सिडको या कार्यालयाच्या वतीने देण्यात आंदोलकांना देण्यात आली आहे.तसेच गेल्या तीन वर्षात नियुक्त केलेल्या या प्रशासकांनी मानमानी मानधन उचलले असून कायद्याची मर्यादा ओलांडून आर्थिक व्यवहार केलेले आहे.त्या सर्व प्रशासकांच्या आर्थिक व्यवहाराची व मानधनांची चौकशी करण्यासाठी श्री. अविनाश भागवत,उपनिबंधक ठाणे शहर यांची नियुक्ती केली असून दोन महिन्याच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले गेले आहेत.विशेष म्हणजे,एका प्रशासकांस २०,१५, १० अशा संख्येने सोसायट्या बहाल केल्या होत्या.हा प्रकार आता बंद होणार असून या पुढे एका प्रशासकाची तीन पेक्षा जास्त संस्थावर नियुक्त होणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे.असे ही निबंधकांच्या वतीने आंदोलकांना लेखी कळविले आहे.हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी मानवी हक्क कार्यकर्ते प्रशांत बोरकर मुंबई यांनी पुढाकार घेतला. तसेच नवी मुंबईतील सहकार संवर्धन समिती आणि माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्यकर्ते व नवी मुंबई नागरिक मंच च्या कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले.सदर आंदोलनाचा हेतू सफल झाला असून हे आंदोलन तूर्त थांबविले जात आहे.या पुढे निबंधकांच्या लेखी अश्वासनावर आम्ही नजर ठेवून ती पूर्ण करून घेऊ असे आंदोलक सुभाष बसवेकर यांनी म्हटले आहे.

## बिंदू नामावलीतील चुकीमुळे आदिवासींच्या आरक्षित पदांवर गंडांतर !; नोक-यांपासून वंचित ठेवण्याचे षडयंत्र,ट्रायबल फोरमचा आरोप

महाराष्ट्र जीत

शासकीय नोकर भरतीत अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांची तरतूद आहे.मात्र ६ मार्च २०२४ रोजी निघालेल्या शासन निर्णयात गंभीर चूक झाली आहे.त्यामुळे राखीव जागांची भरती होतांना आदिवासींची अडवणूक होत आहे.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे सार्वजनिक सेवा विषयक आरक्षणहेभारतीयराज्यघटनेच्याकलम १५(४),१६(४),(४क),३३५,३४२ व आरक्षण अधिनियम २००४ नुसार अबाधित आहे.परंतू आता ६ मार्च २०२४ च्या छोटा संवर्ग बिंदूनामावलीतील चुकीमुळे अनुसूचित जमातीच्या आरक्षित पदांवर गदा आली आहे.

अनुसूचित जाती,जमातीचे आरक्षण हे घटनात्मक व आरक्षण कायद्यानुसार असतांना ६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नोक-यांपासून दूर ठेवण्याचे षडयंत्र रचल्या जात आहे. असा आरोप आदिवासी समाजाच्या घटनात्मक हक्कासाठी लढणाऱ्या 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केला आहे.

६ मार्च २०२४ छोट्या संवर्ग बिंदूनामावलीचा शासन निर्णय रद्द करुन अनुसूचित जमातीचा बिंदू ,अनुसूचित जातीनंतर दुसऱ्या क्रमांकावर दर्शवून तात्काळ शासन निर्णय निर्गमित करण्याची मागणी ट्रायबल फोरमने या संघटनेने केली आहे.

शासन निर्णयात पूर्वी तरतूद होती. नोकर भरतीची पदसंख्या ४ असतांना खुल्या प्रवर्गाची २ पदे ठेवावी.उर्वरित दोन पैकी एक अनुसूचित जाती व एक अनुसूचित जमाती राखीव अशी तरतूद २९ मार्च १९९७ , ५ नोव्हेंबर २००९,२९ मे २०१७,७ मार्च २०१८ ,४ जून २०१९,६ जुलै २०२१,२७ फेब्रुवारी २०२४ या शासन निर्णयानुसार करण्यात आली होती.

८ पदांची जाहिरात असेल तरच प्रवेश

छोट्या संवर्गात एकूण ४ पदे भरावयाची असेल तर तर १ पद अनुसूचित जाती व १ पद अनुसूचित जमाती व २ खुला संवर्गातून भरल्या जात होते.आता मात्र ८ पदांची जाहिरात असेल तरच अनुसूचित जमातीचा बिंदू येतो. अनुसूचित जातीचा बिंदू कायम असतांना फक्त अनुसूचित जमातीचा बिंदू ६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार इतर सर्व प्रवर्गानंतर घेतलेला आहे.

"अनुसूचित जाती, जमातींचे आरक्षण हे घटनेने बहाल केलेले आहे. या प्रवर्गानंतरच इतर सर्व प्रवर्गाचे बिंदू यायला पाहिजे.परंतू ६ मार्च २०२४ चा शासन निर्णय आदिवासी उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवत आहे.यात २९ मे २०१७ च्या शासन परिपत्रकानुसार दुरुस्ती करुन आदिवासींचा बिंदू पूर्वीप्रमाणे दुसऱ्या क्रमांकावर नोंदवून आदिवासींना घटनात्मक न्याय देण्यात यावा. अन्यथा आदिवासी उमेदवारांना शासकीय सेवेत प्रवेश मिळणार नाही."

**- सुनील झळके कार्याध्यक्ष**
**ट्रायबल फोरम, कोकण विभाग**

## ठाणे जि.प.सेवेतील शेलार ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी यांची नियमबाह्य बदली करण्याबाबत शिस्तभंगाच्या कारवाईची मनसेची मागणी!

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** पंचायतराज व्यवस्थेतील महत्त्वाचा संविधानिक कणा असलेल्या ग्रामपंचायतीत काम करणारे लोकसेवक तथा ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करणाऱ्या शरद हरी फर्डे यांचेवर नियमबाह्य बदलीची कारवाई शेलार ग्रामपंचायत येथून कुकसे ग्रामपंचायत कार्यालयात अवघ्या दोन महिन्यात केल्याने त्यांची नियमबाह्य बदली करणाऱ्या प्राधिकरणावर शिस्तभंगाची कारवाई करावी असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना उपतालुका अध्यक्ष आकाश नरेश दिनकर यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचे कार्यालयाकडे केली आहे.ग्रामपातळीवर अधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये ही अधिनियमाचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे, असे निवेदनात नमूद आहे, मात्र प्रशासनात पारदर्शकता कायद्याचे राज्य सुशासन यावर भर न देता दबावतंय व मनमानी कारभारामुळे शेलार ग्रामपंचायतीत कार्यरत असणारे ग्रामविकास अधिकारी शरद हरी फर्डे यांचेवर केवळ दोन महिन्यात बदली कारवाई करून त्यांची नियमबाह्य बदली कुकसे (पडघा) येथे करण्यात आली आहे. सदर बदली प्रकरणी बदल्या व पदस्थापना अधिनियम २००५ अन्वये चौकशीनिहाय संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. शिस्तभंगाची कारवाई होऊन अशा प्रकारचे उल्लंघन होऊ नये असे निर्देश देण्यात यावे अशी मनसेची मागणी आहे.

## मोटार वाहन टॅक्स भ्रष्टाचार प्रकरणी उपलोकायुक्तांकडून कारवाईचा बडगा!

### मोटार वाहन निरीक्षकांसह टंकलेखकांवर वेतन रोखण्याची कारवाई!

### राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद धुमाळ यांचे पाठपुरावा यशस्वी!

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके):** प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे अंतर्गत येत असलेल्या नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी एकूण ८५० वाहनांच्या प्रकरणात ४.० या संगणक प्रणालीवर जुन्या वाहनांची एन्ट्री घेताना सीबीआर नोंदी अद्यावत न करता टॅक्स क्लिअरन्स अप्रुवल बिले म्हणून शासकीय महसूल हानी झाल्याचे निदर्शनास आल्याने मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला आणि लिपिक टंकलेखक मयूर हटकर व सुहास पवार यांचेवर वेतन रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे हा प्रकार चौकशीनिहाय अहवालामुळे उघड झाल्याने परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.

सविस्तर वृत्त असे की, परिवहन जुन्या वाहनांची बॅकलॉग एन्ट्री, टॅक्स क्लिअरन्स व्हेरिफिकेशन व अप्रुव्हल देऊन शासकीय महसुलाची हानी/नुकसान केले जाते असे निवेदन राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद काशिनाथ धुमाळ यांनी परिवहन विभागाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने मा.उपलोकायुक्त कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्याने चौकशीचे सत्र फिरून अखेर दोषी मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला तसेच लिपिक टंकलेखक मयूर हटकर आणि सुहास पवार यांच्यावर पुढील १ वर्षाकरिता वेतन वाढ रोखण्याची कारवाई/ शिक्षा लादण्यात आली आहे, यामुळे परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.

## "मातृभाषेतू वैद्यकीय शिक्षण ऐच्छिक करा मानवता विकास परिषद संस्थापक अध्यक्ष श्री . श्रीकांत सावंत यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर आग्रहाचे आवाहन

महाराष्ट्र जीत

**मुंबई(प्रतिनिधी- गुरुनाथ तिरपणकर) :** मानवता विकास परिषद संस्थापक अध्यक्ष तसेच रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा सर्वांगीण विकास परीषद संस्थापक अध्यक्ष श्रीकांत सावंत यांनी एका प्रसिद्धी संदेशाद्वारे 'मराठी भाषा गौरव दिन २०२६' चे औचित्य साधून सरकारकडे मातृभाषेतून वैद्यकीय शिक्षणासाठी आग्रहपूर्वक आवाहन करत मागणी केली आहे. श्रीकांत सावंत यांनी प्रसिद्धी संदेशात नमूद केले आहे की ही मागणी, गेली अनेक वर्षे शासन तथा विविध लोकप्रतिनिधी, प्रशासन यांची थेट भेट घेत तसेच सामाजिक स्तरावरून देखिल पाठपुरावा करत सातत्याने लावून धरलेली आहे.

यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयातील शिक्षण मराठीतून सुरू व्हावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

श्रीकांत सावंत प्रसिद्धी संदेशात म्हणतात की महाराष्ट्रात एमबीबीएस,



आयुर्वेद, होमिओपॅथी, दंतचिकित्सा व नर्सिंग यांसारखे वैद्यकीय शिक्षण मराठी भाषेतून उपलब्ध होणे आवश्यक आहे.

कोकण व सिंधुदुर्गातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा बुद्ध्यांक तसेच कौशल्य हे अव्वल असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे परंतु वैद्यकीय शिक्षणादरम्यान इंग्रजी भाषेतील न्यूनगंड दूर करण्यासाठी राज्य सरकारने हा निर्णय घ्यावा असे नमूद करताना हे शिक्षण 'ऐच्छिक करा पण करा...' असेही विशेष आग्रहपूर्वक आवाहन केले आहे.

महाराष्ट्र, कोकणसह सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण भागातल्या तळागाळातील विद्यार्थी विद्यार्थीनीना मातृभाषेतून वैद्यकीय शिक्षणाचा लाभ झाला तर स्थानिक स्तरावरील विविध वैद्यकीय रिक्त पदांचा आपसुक, तत्काळ तसेच स्पर्धात्मक गुणवत्ता वाढ होत भरणा होईल. ग्रामीण भागातील वैद्यकीय सुविधा सुधारल्या की नगरे, महानगरे व शहरांतील वैद्यकीय यंत्रणांवरचा ताण देखिल नियंत्रणात येत संपूर्ण राष्ट्राची आरोग्य व्यवस्था सुधारेल अशी विशेष सूचना देखिल श्रीकांत सावंत यांनी प्रसिद्धी संदेशात केली आहे.


बदलत्या काळात 'एआय' ची अत्यावश्यकता आहे सोबतच मातृभाषेतून वैद्यकीय शिक्षण मिळाले तर जिल्ह्यातील असंख्य वैद्यकीय शिक्षण इच्छुकांना त्यांच्या बुद्धी व कौशल्थाला न्याय देण्याचे महत्वाचे कार्य घडेल असाही आशावाद 'मराठी भाषा दिन २०२६' च्या पार्श्वभूमीवर मानवता विकास परिषद व रत्नागिरी सिंधुदुर्ग जिल्हा सर्वांगीण विकास परीषद संस्थापक अध्यक्ष श्रीकांत सावंत यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

# वैभवशाली मराठी भाषेचे दगाबाज कोण?

महाराष्ट्र जीत

मराठी भाषा ही केवळ संवादाचं माध्यम नाही; ती आपल्या संस्कृतीची, इतिहासाची, लढ्यांची आणि संवेदनशीलतेची ओळख आहे. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्या, तुकारामांच्या अभंगांपासून ते लोकमान्य टिळक, सावरकर, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर यांच्यापर्यंत मराठी भाषेने वैचारिक आणि साहित्यिक समृद्धीचा अखंड प्रवास केला आहे. मग प्रश्न असा उभा राहतो—इतकी वैभवशाली मराठी भाषा आज दुय्यम का ठरत आहे? आणि तिचे खरे दगाबाज कोण?




मराठी माणूसच मराठीचा पहिला दगाबाज

सत्य कटू असलं तरी मान्य करावंच लागतं की मराठी भाषेचा पहिला दगाबाज मराठी माणूसच आहे. घरात, खासगी शाळांत, उच्चवर्गीय वर्तुळात मराठीत बोलणं आजही कमीपणाचं लक्षण मानलं जातं. "माझं मूल इंग्रजीतूनच शिकणार" हा हट्ट प्रतिष्ठेचं प्रतिक मानला जातो, पण त्याचवेळी मातृभाषेची गळचेपी होते. भाषा जिवंत राहते ती वापरातून; वापरच नसेल तर वैभव केवळ पुस्तकांत बंदिस्त राहतं.

इंग्रजी-मोह आणि न्यूनगंड

आजच्या काळात इंग्रजी ही संधीची भाषा आहे, हे नाकारता येणार नाही. पण इंग्रजी शिकताना मराठीला दुय्यम ठरवणं ही आत्मघातकी मानसिकता आहे. इंग्रजी बोलणं म्हणजे बुद्धिमत्ता, प्रगती आणि आधुनिकता असा गैरसमज मराठी समाजात खोलवर रुजलेला आहे. मराठीत विचार करणं मागासलेपणाचं लक्षण मानलं जातं. हाच न्यूनगंड मराठी भाषेच्या मुळावर उठलेला आहे.

शासन आणि प्रशासनाची उदासीनता

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असतानाही शासकीय कार्यालये, न्यायालये, विद्यापीठे, बँका आणि खासगी आस्थापनांत मराठीला दुय्यम वागणूक मिळते. फलक इंग्रजीत, कागदपत्रे इंग्रजीत आणि व्यवहारही इंग्रजीत—अशी परिस्थिती असेल, तर सामान्य माणूस मराठीला गांभीर्याने का घेईल? कायदे आहेत, पण अंमलबजावणी नाही. ही उदासीनता म्हणजे मराठीशी केलेला संस्थात्मक द्रोहच आहे.

शिक्षण व्यवस्थेतील गोंधळ

मराठी माध्यमाच्या शाळा कमी होत चालल्या आहेत. शिक्षकांची गुणवत्ता, अभ्यासक्रमाची अद्ययावतता आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची तयारी कमी पडते. परिणामी पालकांचा मराठी माध्यमावरचा विश्वास ढासळतो. दोष केवळ पालकांचा नाही; शिक्षण व्यवस्थेने मराठी माध्यम आकर्षक, सक्षम आणि स्पर्धात्मक बनवण्यात अपयश पत्करलं आहे.

माध्यमे आणि मनोरंजन विश्व

दूरचित्रवाणी, सोशल मीडिया, जाहिरातसृष्टी आणि चित्रपटांमध्ये मराठीचा वापर होत असला तरी त्यात शुद्धतेपेक्षा भेसळीचं प्रमाण वाढलं आहे. अकारण इंग्रजी शब्दांची भडिमार, चुकीचे उच्चार, अशुद्ध लेखन यामुळे भाषेचं सौंदर्य विद्रूप होतं. लोकप्रियतेसाठी भाषा हलकी करणं हेही एक प्रकारचं दगाबाजीच आहे.

साहित्यिक आणि बुद्धिजीवींची मूक भूमिका

कधीकाळी समाजाला दिशा देणारे साहित्यिक, विचारवंत आणि बुद्धिजीवी आज मराठी भाषेच्या प्रश्नावर फारसे आक्रमक दिसत नाहीत. पुरस्कार, पदे आणि वैयक्तिक सोयी यांच्या पुढे भाषेचं भान मागे पडतं. भाषा जपण्याचं नेतृत्वच दुर्बल झालं, तर सामान्य माणसाकडून अपेक्षा कशी ठेवायची?

बाजारपेठ आणि कॉर्पोरेट संस्कृती

आजच्या बाजारपेठेत "मराठी ब्रँड" असण्यापेक्षा "इंग्रजी नाव" अधिक विक्रीक्षम मानलं जातं. दुकाने, गृहनिर्माण प्रकल्प, कंपन्या, ॲप्स—सगळीकडे इंग्रजी नावांची चलती आहे. नफ्याच्या गणितात मराठी मागे पडते. हा आर्थिक दृष्टीने झालेला विश्वासघातही मराठीच्या अध:पतनाला कारणीभूत आहे.

दगाबाज नेमके कोण?

मराठी भाषेचे दगाबाज कोण, असा प्रश्न विचारल्यावर बोट एकाच दिशेने दाखवता येत नाही.

मराठीचा अभिमान न बाळगणारा मराठी माणूस, मराठी भाषांचा नाहक वापर.

भाषेची अंमलबजावणी न करणारे राज्यकर्ते, राज्यकर्त्यांची मतांच्या लाचारीची स्वार्थी मानसिकता

इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही सर्व व्यवहारात आणि अभ्यासक्रमामध्ये मराठीचा वापर करणे बंधनकारक नसल्याचे, दुर्दैवी आणि घातक बाब.

दर्जेदार मराठी शिक्षण न देणारी व्यवस्था, मराठी शाळा बंद करण्याचे षडयंत्र.

भेसळ करणारी माध्यमे,

आणि मौन बाळगणारे बुद्धिजीवी—

हे सगळे मिळून मराठी भाषेचे दगाबाज ठरतात.

उपाय ?

दोष शोधण्याइतकीच गरज उपायांची आहे.

मराठीचा अभिमान दिखाऊ न ठेवता व्यवहारात आणायला हवा.

घरात मराठी, शाळेत दर्जेदार मराठी, कार्यालयात व्यवहारिक मराठी आणि माध्यमांत शुद्ध मराठी—हा चार स्तंभांचा पाया उभा राहिला, तरच मराठीचं वैभव टिकेल. इंग्रजीच्या विरोधात न जाता, मराठीच्या बाजूने ठाम उभं राहणं ही काळाची गरज आहे.

निष्कर्ष

मराठी भाषेला केंद्र सरकारकडून ऑक्टोबर २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा बहाल करण्यात आला असला तरीसुद्धा,मराठी भाषा आज महाराष्ट्रातच संकटात आहे, हे सत्य नाकारता येणार नाही. पण ही भाषा दुर्बल नाही; ती दुर्लक्षित आहे. परंतु तितकेच समृद्धही आहे. ज्या दिवशी मराठी माणूस स्वतःच्या भाषेकडे डोळसपणे पाहील, त्या दिवशी मराठीचं वैभव पुन्हा उजळेल.

संत ज्ञानेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठी भाषेला महत्त्व देऊन मराठी जोपासली, राज्य कारभार चालवला, अनेक संत साहित्य व साहित्यिकांनी समृद्ध केलेली मराठी वाचवायची असेल, तर आधी मराठी माणसाला स्वतःपासून वेडात मराठे वीर दौडले सात अशा पद्धतीनेच पुन्हा सुरुवात करावी लागेल. प्रत्येक मराठी माणसाने आणि सरकारने दैनंदिन जीवनात व राज्य कारभारामध्ये मराठीचा अट्टाहास आणि आग्रह करावा लागेल.

**लेखक**
**सुनील सुंदराबाई धाऊ झळके, भिवंडी.**
**संपर्क क्रमांक - 9860290353**

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा" व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक उपक्रम संपन्न

महाराष्ट्र जीत

**मुंबई,(केतन भोज) :** आम्हाला गर्व हिंदुत्वाचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या महाराष्ट्रातील शिवसैनिक सदस्य असलेला व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून सामाजिकसेवा अंतर्गत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक ३१ वा उपक्रम जिल्हा नाशिक,त्र्यंबकेश्वर येथील आधार तीर्थ या आश्रमात आचार संहिता मुळे २२ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आला.आधार तीर्थ या आश्रमातील मागणी नुसार अनाथ लहान मुलांना बसण्यासाठी ५ गार्डन बेंच,विविध प्रकारचे कडधान्य,लहान मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण साहित्य,भरपूर प्रमाणात शालेय वस्तू,लहान मुलांना कपडे,वेगवेगळ्या प्रकारचे बिस्कीट,फरसाण तसेच गृहउपयोगी वस्तू भरपूर प्रमाणात अनाथ आश्रमास देण्यात आले.




या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून आलेले ग्रुपचे ५० सदस्य उपस्थित होते.तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नाना गायकवाड (शिवसेना उपनेता नाशिक) सौ.स्वाती पाटील ताई (महिला जिल्हा संघटीका नाशिक) महेश बडवे(उपजिल्हा प्रमुख नाशिक)नितीन जाधव(विभाग प्रमुख नाशिक) गिरीष मुसळे(व्यवस्थापक) तसेच ग्रुपचे संतोष पाटील (संस्थापक,संचालक) महेंद्र गुरव (संचालक)सुरेश वाडकर (अध्यक्ष)लवेश म्हात्रे(सेक्रेटरी)लिलाधर भोईर (प्रवक्ते)सौ.संपदा धोंगडे (प्रवक्ते)संदीप गुरव,भालचंद्र उकिर्डे,वासंती गोताड,प्रवीण कोरपे,सुजाता धारगळकर,सोनिया पाटील,दिलीप गावडे,संतोष झोळ,अनिल कांबळे,विलास चव्हाण,सुनील काप तसेच विविध विभागातून आलेले ग्रुपचे असंख्य सदस्य उपस्थित होते.

## विष्णुदादा भोसले यांच्या सक्षम पाठींब्याने पीडीत शेतकऱ्यांच्या संघर्षमय लढ्याला यश

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप /पुरंदर :** पुरंदर तालुक्यातील मौजे आंबोडी तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील महारवतन धारक शेतकरी यांच्या महारवतन वर्ग २ या शेतजमिनी मधून १२ फुटी रस्ता आंबोडी गावचा व पुरंदर तालुक्याशी कसलाही संबंध नसलेल्या अलिकडील काळात जमिन खरेदी केलेल्या उद्योजक इसमास रस्ता मंजूर करण्याचा आदेश पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांनी दिला होता तसेच सासवडचे मंडलाधिकारी सुहास कांबळे यांनी या केसमध्ये खोटा स्थळ पाहणी अहवाल सादर केला होता, त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व तहसिलदार यांनी दिलेला अन्यायकारक निर्णय रद्द करण्यात यावा, या मागणीसाठी पीडीत शेतकरी प्रकाश रणपिसे अशोक रणपिसे चंद्रकांत रणपिसे व इतर शेतकरी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली गेले ३७ दिवस पुरंदरच्या प्रांत वर्षा लांडगे यांच्या कार्यालयासमोर बेमुदत आंदोलनाला बसले होते, आंदोलनाच्या ३७ व्या दिवशी पीडीत शेतकऱ्यांच्या संघर्षमय लढ्याला यश मिळाले.



पुरंदरच्या प्रांत वर्षा लांडगे यांनी पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांनी पीडीत शेतकऱ्यांच्या शेतामधून रस्ता मंजूर करण्याचा दिलेल्या आदेशाला मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थगिती देऊन प्रांत वर्षा लांडगे यांनी पीडीत शेतकऱ्यांना दिलासा दिला .

रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले हे सक्षमपणे, या शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून आंदोलनाची सर्व सुत्रे त्यांनी स्वतः सांभाळली त्यामुळे पीडीत महार वतन धारक शेतकरी यांना न्याय मिळाला, अशी भावना सर्व पीडीत शेतकऱ्यांनी व्यक्त करुन आंदोलनाच्या बातम्या लावणा-या पत्रकार संपादक व आंदोलनाला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे पीडीत शेतकऱ्यांनी आभार मानले, याबाबत हकीगत अशी पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांच्याकडे मुळ आंबोडी गावचा रहिवासी नसलेल्या उद्योजक अन्वर बाबूलाल शेख या इसमाने महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १४३ नुसार आंबोडी व कुंभारवळण शीवरस्ता खुला करुन द्यावा अशी मागणी केली होती हा अर्ज फेटाळण्यास पात्र असताना देखील, आर्थिक तडजोडीतून तो स्विकारला होता,सासवडचे मंडलाधिकारी यांनी देखील आर्थिक तडजोडीतून खोटा स्थळ पाहणी अहवाल सादर करुन, चूकीचे काम केले, अर्जदार यांची मागणी शीवरस्त्याची असताना तहसिलदार यांनी गैर अर्जदार म्हणजे पीडीत शेतकरी यांना नोटीस न देता त्यांना गैरहजर दाखवून,पीडीत शेतकऱ्यांच्या शेतामधून १२ फुटी रस्ता मंजूर करुन शेतकऱ्यांवर अन्याय केला होता ही बाब विष्णूदादा भोसले यांनी शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली, व एक हजार लोकांनी यावर अपिला शिवाय पर्याय नाही अनेकांनी आंदोलनाची खिल्ली उडविली अनेक अनाधिकृत दलालांनी आंदोलन कर्ते यांना चूकीचे सल्ले देऊन विचलीत करण्याचा प्रयत्न केला परंतु सर्व पीडीत शेतकऱ्यांनी विष्णूदादा भोसले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आंदोलन सुरच ठेऊन ते निर्णयावर ठाम राहिल्याने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांच्या वतीने प्रांत वर्षा लांडगे यांच्या कार्यप्रणालीचा जाहीर निषेध करण्यासाठी व संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी जाहीर जागरण गोंधळ आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता परंतु अखेर विजय सत्याचा व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाचा व रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचा आहे व पीडीत शेतकऱ्यांच्या सामुहिक एकजुटीचा आहे. असे रिपाइं नेते विष्णूदादा भोसले, सांगितले, ,

## भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई– मनपा आयुक्त अनमोल सागर

महाराष्ट्र जीत

**भिवंडी (सुनील झळके) :** भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक रस्ते, पदपथ, उड्डाणपूल, चौक, शासकीय/महानगरपालिका मालमत्ता तसेच खासगी मालमत्तांवर मालकाची परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज लावण्यात येत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आली आहे. सदर कृत्य हे कायद्यानुसार दंडनीय व बेकायदेशीर आहे:




सदर प्रकारामुळे शहराचे सौंदर्य विद्रूप होत असून, सार्वजनिक सुव्यवस्था, वाहतूक सुरक्षा व नागरिकांच्या सुरक्षिततेस बाधा निर्माण होत आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून याकामी कार्यवाहीचे कठोर आदेश आयुक्त अनमोल सागर(भा.प्र. से.) यांनी प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना निर्गमित केले होते.

त्यानुसार प्रभाग समिती क्रमांक १ ते ५ चे सर्व सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांचे मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, फ्लेक्स व होर्डिंग्ज हटविण्याची विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये एकुण ४२ अनधिकृत पोस्टर, १३८ अनधिकृत बॅनर्स हटविण्यात आले असून एका विरोधात गून्हा दाखल केला आहे. आयुक्त सागर यांच्या मार्फत सदरची विशेष तपासणी मोहीम दर आठवडयाला राबविण्यात येणार असल्याचे सुचित केले असून संबंधित अनधिकृत फलक/बॅनर्सवर नमूद असलेली नावे, संस्था, राजकीय पक्ष, आयोजक, छपाई करणारे व प्रायोजक यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरण अधिनियम, १९९५ अंतर्गत थेट गुन्हा दाखल करावा व हटविण्यात आलेल्या साहित्याचा पंचनामा करून त्याचा संपूर्ण खर्च संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडून वसूल करण्यात यावा असे स्पष्ट निर्देश मा. आयुक्त यांनी प्रभाग अधिकारी यांना दिले आहेत.

## महागांवात सत्तेसाठी रणसंग्राम!

### महागांव नगरपंचायत मध्ये काँग्रेसचा कडक व्हीप; आदेश मोडल्यास थेट अपात्रतेचा इशारा

महाराष्ट्र जीत

**लखन लोंढे / महागांव :** महागांव नगरपंचायतीतील नगराध्यक्ष निवड आता थेट राजकीय अस्तित्वाची लढाई बनली आहे. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या विशेष सभेआधीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या सर्व नगरसेवकांना कडक पक्षादेश (व्हीप) बजावत शिस्तीचा चाबूक दाखवला आहे.



काँग्रेसचे गटनेते शैलेशकुमार दिलीपराव सुरोशे यांनी २६ फेब्रुवारी रोजी जारी केलेल्या व्हीपनुसार, सर्व सदस्यांनी सभेला अनिवार्य उपस्थित राहून अधिकृत उमेदवार रुपाली संतोष कोल्हेकर यांच्या बाजूनेच मतदान करावे, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. "हात उंच करून समर्थन" हा शब्दप्रयोगच पक्षाच्या निर्धाराची साक्ष देतो.

जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल मानकर यांच्या आदेशानुसार कोल्हेकर यांना अधिकृत उमेदवारी देण्यात आली असून पक्षातील मतभेदांना थारा दिला जाणार नाही, हे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणताही सदस्य अनुपस्थित राहिला किंवा विरोधात मतदान केले तर त्याच्यावर थेट कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.पक्षादेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८६ अंतर्गत अपात्रतेची कारवाई केली जाईल, असा थेट इशारा देण्यात आल्याने नगरसेवकांमध्ये खळबळ उडाली आहे.महागांव नगरपंचायतीतील सत्तासमीकरणे तापली असून, बंडखोरी होणार का? की काँग्रेस आपली ताकद दाखवणार? २७ फेब्रुवारीची सभा आता राजकीय भवितव्य ठरवणारी ठरणार आहे.

# पत्रांच्या माध्यमातून जोडलेले जागतिक नाते

"एकाच छताखाली अनुभवा मराठी भाषेचे वैभव आणि अक्षरांचा नयनरम्य उत्सव!"

अक्षरोत्सव : पत्रांतून जपलेला जागतिक साहित्याचा आणि स्नेहाचा अनमोल ठेवा

२० वर्षांचा अविरत वारसा : अक्षरांच्या पाऊलखुणा जपणारा 'अक्षरोत्सव': पत्रकार निकेत पावसकर यांचा २० वर्षांचा ध्यास : शालेय मुलांमध्ये लेखनाची ओढ.: राज्यभर प्रदर्शनांचे आयोजन

"मान्यवरांची शाबासकी आणि मुलांचे कुतूहल... हाच 'अक्षरोत्सव'चा खरा ठेवा!

अक्षरांच्या या अद्भुत जगाला २० वर्षे पूर्ण होत आहेत, हा मराठी भाषेचाच सन्मान आहे!

डिजिटल क्रांतीच्या ओघात आजची पिढी कीबोर्ड आणि टचस्क्रीनच्या आहारी जात असताना, हाताने लिहिलेली सुंदर अक्षरे आणि साहित्याचा वारसा जपणे हे मोठे आव्हान बनले आहे. हेच आव्हान पेलले आहे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकार निकेत पावसकर यांनी. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ त्यांनी 'अक्षरोत्सव' या उपक्रमाच्या माध्यमातून अक्षरांची संस्कृती घराघरांत आणि मनामनांत पोहोचविण्याचे प्रयत्न करत आहेत.

मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने आपण भाषेचा अभिमान बाळगत असतानाच, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तळेरे सारख्या ग्रामीण भागातून उभी राहिलेली एक विलक्षण चळवळ आज सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. ती चळवळ म्हणजे 'अक्षरोत्सव'. तंत्रज्ञानाच्या युगात जिथे पत्रसंस्कृती लोप पावत आहे, तिथे केवळ एका पत्राच्या माध्यमातून जगभरातील दिग्गजांशी 'पत्रमैत्री' जुळवण्याचा चमत्कार या संग्रहाने करून दाखवला आहे. डिजिटल स्क्रीनच्या जमान्यात जेव्हा मुले लेखणीपासून दूर जात आहेत, अशा काळात 'अक्षरोत्सव'ने अक्षरांच्या माध्यमातून संस्कृतीची गुंफण घातली आहे.

मराठी भाषेचा अभिमान आणि साहित्याचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हे केवळ कर्तव्य नसून ती काळाची गरज आहे. याच ध्येयाने झपाटलेली 'अक्षरोत्सव' ही चळवळ गेल्या २० वर्षांपासून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अक्षरांचे बीज पेरत आहे. केवळ एक संग्रह म्हणून मर्यादित न राहता, या उपक्रमाने मुलांच्या मनात साहित्याची ओढ निर्माण करण्याचे मोठे काम सुरु केले आहे.

अफाट व्याप्ती : २००० दिग्गजांची साथ

या संग्रहाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे सुप्रसिद्ध कवी विंदा करंदीकर यांच्या पात्रापासून सुरु झालेल्या या संग्रहात देश-परदेशातील तब्बल २००० दिग्गज व्यक्तींच्या हस्ताक्षरातील संदेशांचा समावेश आहे. केवळ स्वाक्षरी नाही, तर त्या व्यक्तींच्या भावना व्यक्त करणारी संदेश पत्रे हे या संग्रहाचे वैभव आहे. यामध्ये नोबेल विजेते, भारतरत्न, पद्म पुरस्कार सन्मानित व्यक्तींपासून ते ज्ञानपीठकार आणि साहित्य अकादमी विजेत्यांपर्यंतच्या मान्यवरांच्या अक्षरांचा ओलावा जपलेला आहे.

भाषा आणि लिपींचा संगम

मराठी भाषेचा अभिमान बाळगतानाच या संग्रहाने जागतिक दृष्टिकोन जपला आहे. यात प्रामुख्याने मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील पत्रे असली, तरी संस्कृत, कोकणी, मोडी, ब्राम्ही, चायनीज आणि अंधांसाठीची ब्रेल लिपी अशा विविध लिपींमधील संदेशांचा खजिना येथे पहायला मिळतो. हा संग्रह म्हणजे खऱ्या अर्थाने 'अक्षर वाङ्मयाचा' उत्सवच आहे.

संस्कृती आणि साहित्याचा संगम

अक्षरोत्सव म्हणजे केवळ कागदावरची अक्षरे नव्हेत, तर ती आपल्या लोककला, संस्कृती आणि समृद्ध साहित्याचा आरसा आहे. गेल्या दोन दशकांत या संग्रहाने राज्याच्या विविध भागांत प्रदर्शने भरवून मराठी भाषेचे वैभव जनसामान्यांपर्यंत, विशेषतः शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले आहे.हा प्रवास पुढेही निरंतर सुरु राहणार आहे.

वैविध्यपूर्ण क्षेत्रांचा समावेश

या चळवळीने कोणत्याही एका क्षेत्रापुरते स्वतःला मर्यादित ठेवलेले नाही. यात साहित्य व कला (साहित्यिक, चित्रपट कलाकार, नाट्यकर्मी, चित्रकार), विज्ञान व प्रशासन (शास्त्रज्ञ, प्रशासकीय अधिकारी), समाजकारण व राजकारण (स्वातंत्र्यसैनिक, लोकप्रतिनिधी, समाजसेवक), क्रीडा व इतर (खेळाडू, जागतिक विक्रमवीर, सुलेखन आणि धार्मिक क्षेत्रातील व्यक्ती) यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

प्रदर्शने : एक फिरते विद्यापीठ

अक्षरोत्सव संग्रहाची प्रदर्शने म्हणजे ज्ञानाचा खजिनाच असतो. राज्याच्या विविध जिल्ह्यांत, शाळा-महाविद्यालयांत भरलेली ही प्रदर्शने पाहून अनेक मान्यवरांनी आश्चर्य व्यक्त केले आहे. ही प्रदर्शने केवळ पाहण्यासाठी नसून, त्यातून विद्यार्थ्यांना आपली संस्कृती किती प्रगल्भ आहे, याची जाणीव करून दिली जाते.महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात अशी २५ प्रदर्शने भरविण्यात आलेली आहेत.

तळेरे ते जागतिक क्षितिज : एक जिद्दीचा प्रवास

एका बाजूला ५ हजारहून अधिक व्यक्तींना १० हजार वेळा पत्रे पाठवण्याचा संयम आणि दुसरीकडे त्यातून निर्माण झालेली 'पत्रमैत्री'. ग्रामीण भागात राहूनही केवळ पत्रांच्या जोरावर जगभरातील नामवंतांशी संवाद साधता येतो, हे या चळवळीने सिद्ध केलेले आहे. या कार्याची दखल सह्याद्री वाहिनीने थेट प्रक्षेपण असलेल्या 'नमस्कार मंडळी' आणि 'Beyond Thought' या कार्यक्रमातून तसेच आकाशवाणीवर मुलाखतींमधून या प्रतिष्ठित माध्यमांनी वेळोवेळी घेतलेली आहे.









केवळ प्रदर्शन नाही, तर संस्कार!

'अक्षरोत्सव' हे केवळ प्रदर्शनापुरते मर्यादित राहिलेले नाही. महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातील विविध शाळांमध्ये प्रदर्शने भरवून त्यातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला जातो. "छंद का जोपासावा आणि त्याचे आयुष्यातील महत्त्व" यावर मार्गदर्शन करून नवी पिढी घडवण्याचे कार्य या माध्यमातून सुरू आहे. 'अक्षरोत्सव'च्या राज्यव्यापी प्रदर्शनांतून आजवर हजारो विद्यार्थ्यांनी अनमोल विचार, साहित्य आणि अक्षरांचे सौंदर्य अनुभवले आहे. दुर्मिळ हस्तलिखिते, सुलेखनाची किमया आणि आपल्या मातीतील लोककलांचा हा खजिना पाहून अनेक मान्यवरांनीही थक्क होऊन या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

पत्रातील अक्षरे ही केवळ शाई नसते, तर ती त्या व्यक्तीच्या विचारांचे प्रतिबिंब असते. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने, 'अक्षरोत्सव' ही चळवळ आपल्याला पुन्हा एकदा आपल्या मुळाकडे, म्हणजेच 'संवाद' आणि 'अक्षरांकडे' घेऊन जाते. या अनोख्या छंदाला आणि त्यातून उभ्या राहिलेल्या या ज्ञानयज्ञाला सलाम!

निकेत पावसकर यांनी अत्यंत मेहनतीने 'अक्षरोत्सव' नावाचा आगळावेगळा संग्रह जमवला आहे. हा संग्रह केवळ स्वक्षर्यांचा नसून तर या संग्रहात हस्ताक्षरातील विचारांचे समृध्द दालन (दिग्गज साहित्यिक,कवी आणि विचारवंतांच्या हस्ताक्षरांचे दुर्मिळ नमुने, विचार), सुलेखन (Calligraphy) (अक्षरांना कलेचे रूप देणारे विविध सुलेखन प्रकार), सांस्कृतिक ठेवा (महाराष्ट्रातील लोककला, सण-उत्सव आणि ऐतिहासिक संदर्भांची माहिती देणारी साधने), दुर्मिळ हस्ताक्षरे आणि विचार (ज्यांच्या साहित्याने मराठी भाषा समृद्ध झाली, अशा अनेक मान्यवरांचा वैचारिक खजिना) अनुभवण्यास मिळतो.

"अक्षरोत्सव हा केवळ उपक्रम नसून मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सुरू असलेला एक यज्ञ आहे. मुलांच्या हाताला अक्षराची गोडी लागणे, हेच भाषेचे खरे यश आहे." असे गौरोदगार अनेक मान्यवरांनी काढलेले आहेत. तर गेली ४ वर्षे शालेय मुलांना लेखनाची आवड निर्माण व्हावी, त्यातूनच सामाजिकता जोपासली जावी यासाठी सिंधुदुर्ग जिल्हास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली जाते. यात्साठी सामाजिक विषयावरील मजकूर विद्यार्थ्यांना लेखनासाठी देऊन दुहेरी हेतू साधण्याचा प्रयत्न सुरु आहे.

अक्षरघराला यांनी दिली भेट

तळेरे येथील अनोखी संकल्पना असलेल्या अक्षरघराला विविध क्षेत्रातील व्यक्तींनी भेट देऊन प्रशंसा केली आहे. ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. सुनिलकुमार लवटे, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर, आंतरराष्ट्रीय महिला क्रिकेटपटू पूनम राऊत, फुटबॉल खेळाडू जयेश राणे, प्रसिध्द नाट्य समिक्षक अरुण घाडिगावकर, अभिनेते, दिग्दर्शक संजय खापरे, दिग्दर्शक दिपक कदम, गझलकार मधुसूदन नानिवडेकर, कवी गीतकार प्रसाद कुलकर्णी, साहित्यिक, कथाकथनकार वृंदा कान्बळी, आंतरराष्ट्रीय पंच अशोक दाभोलकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या नेमबाज रोहिणी हवालदार, कवी प्रा. प्रदिप पाटिल, ज्येष्ठ विचारवंत वैजनाथ महाजन, लेखक रविप्रकाश कुलकर्णी, समीक्षक प्रसाद घाणेकर, आंतरराष्ट्रीय कामगार नेते विद्याधर राणे, महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र बेडकिहाळ, अभिनेत्री प्राजक्ता वाडये, इस्लामपुरचे डीवायएसपी कृष्णात पिंगळे, चित्रकार राज शिंगे, सुप्रसिध्द चित्रकार प्रकाश कब्रे, पर्यावरण अभ्यासक- लेखक धीरज वाटेकर, घुंगुरकाठीचे संस्थापक सतिश आणि सौ. सई लळीत, माजी राज्यपालांचे सहसचिव प्रा. विनायक दळवी, हास्यसम्राट फेम अभिजित कोष्टी, उपविभागीय तथा प्रांताधिकारी वैशाली राजमाने यांच्यासारख्या अनेक व्यक्तींनी भेट देऊन अक्षरघराचे कौतुक केले आहे.

या परदेशी व्यक्तींची पत्रे संग्रहात

निकेतच्या या संग्रहामध्ये जागतिक किर्तिचा खेळाडू, टेनिसच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडू रॉजर फेडरर (स्वित्झर्लंड), मुहम्मद युनुस (बांग्लादेश), आयर्लंड देशाचे पंतप्रधान डॉ. लिओ वराडकर, युरोपियन सेन्ट्रल बँकेचे चेअरमन मारिओ ड्राघी (जर्मनी), हॉलीवूड निर्माता अभिनेता दिग्दर्शक सर मायकेल केन (लंडन), अभिनेता जॅकी चेन, अमेरिकन मॉडेल आणि अभिनेत्री कॅरोल अल्ट, मॉडेल-अभिनेत्री-गायिका-नृत्यांगना आणि प्राणीमित्र ब्रिगेट बार्दोत (पॅरीस), वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रिमीयर मार्क मॅंकगोवन, सुप्रसिध्द टेनिस खेळाडू स्टेफी ग्राफ, नोबेल पुरस्कार विजेते अर्थशास्त्रज्ञ डॉ. अभिजित बॅनर्जी (अमेरिका) यासह अनेक परदेशी व्यक्तींच्या पत्रांचा समावेश आहे.

या मान्यवरांनी केले कौतुक

यापूर्वी बेळगाव, मुंबई, कोल्हापूर, नाशिक, चिपळूणसह रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध माध्यमिक शाळा, वाचनालये आणि इतर कार्यक्रमानिमित्त मिळून 25 प्रदर्शने झाली असून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला आहे. यावेळी विविध मान्यवरांनी या संग्रहाचे कौतुक केले असून विविध ठिकाणी नामवंत व्यक्तींनी प्रदर्शनाला भेटही दिलेली आहे. सुप्रसिद्ध चित्रकार प्रकाश कब्रे, अभिनेते माधव अभ्यंकर, पद्मश्री परशुराम गंगावणे, प्रसिध्द कवी महेश केळुसकर, गायक नंदेश उमप, मल्लखांब खेळाडू हिमानी परब, फुटबॉल खेळाडू जयेश राणे, किट्टू म्याकल, कबड्डी खेळाडू - प्रशिक्षक मेघाली आणि सचिन म्हसकर, अभिनेते शेखर फडके, नगरसेवक प्रकाश गंगाधरे, ढोलकी वादक विजय चव्हाण, आमदार बाळा नर, कवी गीतकार प्रसाद कुलकर्णी, बाल मुकुंद पत्की, पालकमंत्री तथा मत्स्योद्योग मंत्री नितेश राणे, मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे रवींद्र मालुसरे, ज्येष्ठ लोककला अभ्यासक - नृत्य दिग्दर्शक सदानंद राणे, चित्रकार किशोर नादावडेकर, लेखक जोसेफ तुस्कानो, ज्येष्ठ शाहीर मधू खामकर, लेखक - अभिनेते निनाद शेट्ये, नाट्य समीक्षक अरुण घाडीगावकर, हास्यसम्राट अजितकुमार कोष्टी, कवी सतीश मोघे, कोकणी महोत्सवाचे संयोजक संजय धुरत, सुलेखनकार श्रीकांत गवंडे, अभिनेते शशिकांत खानविलकर, संपादक प्रमोद कोनकर, संपादक राजेंद्रप्रसाद मसुरकर, प्रसिद्ध सतार वादक विदुर महाजन, लेखिका डॉ. अपर्णा महाजन, आंतरराष्ट्रीय व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर, कवी अजय कांडर आदी मान्यवरांनी या संग्रहाची पाहणी करून कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना संदेश पत्र संग्राहक म्हणाले की, हा संग्रह केवळ पाहण्याचा नाही, ऐकण्याचा नाही. तर तो प्रत्यक्ष वाचून अनुभवण्याचा संग्रह आहे. यातून शालेय मुलांच्या मनात जिद्द निर्माण करणारी ऊर्जा मिळते. हे 'अक्षरांचे मोती' आपल्या पुढच्या पिढीसाठी मार्गदर्शक आणि गुरूची भूमिका बजावत आहेत. मुलांनी या विचारांतून बोध घ्यावा आणि आपल्या यशस्वी आयुष्यासाठी नवी वाट चोखाळावी, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे. अशा महान व्यक्तींचे विचार मुलांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. ही अक्षरे त्यांना केवळ परीक्षेसाठी नाही, तर आयुष्याच्या परीक्षेत यशस्वी होण्यासाठी बळ देतील, असा विश्वास वाटतो.

मराठी भाषा गौरव दिनी एक संकल्प

आज जेव्हा आपण कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा करत आहोत, तेव्हा 'अक्षरोत्सव' सारख्या चळवळींचे महत्त्व अधोरेखित होते. भाषेचा केवळ उदोउदो करण्यापेक्षा, तिला कृतीतून जपण्याचे काम हा संग्रह करत आहे. २० वर्षांचा हा अविरत प्रवास मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्याची ग्वाही देतो.'अक्षरोत्सव' हा उपक्रम महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील एक दीपस्तंभ आहे. या चळवळीने जोपासलेला हा अक्षरांचा वारसा येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. अक्षरांचा हा उत्सव असाच अखंड सुरू राहो आणि यातून साहित्याची नवी पिढी घडत राहो.

कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी आपण मराठी भाषेचा गौरव करतो. खरा गौरव हा केवळ घोषणांत नसून तो भाषेच्या संवर्धनात असतो. 'अक्षरोत्सव' ही चळवळ मराठी भाषेची मुळे घट्ट करण्याचे काम करत आहे. नवी पिढी जेव्हा मराठी साहित्याकडे आनंदाने वळते, तेव्हाच खऱ्या अर्थाने मराठी भाषा 'अभिजात' ठरते. कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी आपण मराठी भाषेचा अभिमान बाळगत असताना, निकेत पावसकर यांच्यासारखे व्यक्तिमत्व प्रत्यक्षात भाषेसाठी काम करत असते. 'अक्षरोत्सव' ही चळवळ मराठी भाषेचा डोलारा नव्या पिढीच्या खांद्यावर समर्थपणे पेलण्यासाठी सज्ज करत आहे.

याबाबत संपर्कासाठी :

**श्री निकेत नरहरी पावसकर,**
**प्रमुख अक्षरोत्सव परिवार, तळेरे**
**मु. पो. तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग. ४१६८०१**
**संपर्क क्रमांक : ९८६०९२७१९९ / ९४०३१२०१५६**

महाराष्ट्र जीत

# कर्णबधिर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र वितरण

महाराष्ट्र जीत

**नाशिक रोड प्रतिनिधी गोकुळ लोखंडे :** उद्योग-व्यवसायात कार्यरत असताना ही"ज्युनिपर ग्रीन एनर्जी लिमिटेड" ही कंपनी सामाजिक बांधिलकी जपत असते. याच जाणिवेतून तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शनाखाली "प्रोजेक्ट श्रुती" अंतर्गत त्यांनी विकास मंदिर शाळेतील 23 व इगतपुरी, मखमलाबाद आदी शाळांमधील 35 असे सुमारे रूपये एक कोटी मुल्याचे एकूण 58 कर्णबधिर विद्यार्थ्यांना ओडिओमेट्री तपासणी करून उच्च प्रतीचे, चार्जिंग होणारे " श्रवणयंत्रे" आज रोजी कंपनीचे वतीने वितरित करण्यात आली.यावेळी संस्थेच्या सचिव डॉ सौ सुहासिनी घोडके यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. या स्तुत्य उपक्रमाचे उदघाटन दिप प्रज्वलनाने करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ सचिन देवरे यांनी भूषविले तर डॉ सुदर्शन आहिरे (नाक, कान, घसा तज्ञ) नाशिक व श्री सोयब सय्यद (ऑडिओलॉजिस्ट) हे प्रमुख पाहुणे लाभले होते. तसेच ज्यूनिपर ग्रीन एनर्जी लिमिटेड कंपनी चे वतीने व्हाइस प्रेसिडेंट झाईद अन्सारी, व्हाईस। प्रेसिडेंट , मोहम्मद। साफियांन ,सुनील निकम, रोहीत बोराले



सैलेंती समलेती , आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ आहिरे म्हणाले की या कर्णबधिर मुलांना ही श्रवणयंत्रे खूप फायदेशीर आहेत. यामुळे मुले ऐकू शकतात व संभाषण करू लागतात. त्यामुळे ते मुळ प्रवाहात येवून सामान्य जीवन जगू शकतात."कंपनीच्या वतीने श्री अंसारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. " कंपनीच्या वतीने या मुलांना श्रवणयंत्रे वाटप करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. या यंत्राच्या वापरामुळे ही मुले सर्वसामान्य आयुष्य आनंदाने जगू शकतात. तसेच विकास मंदिर शाळेचे व्यवस्थापन अतिशय उत्तम आहे. त्यामुळे उर्वरित मुलांनाही श्रवणयंत्र देण्याचा आम्ही निश्चित प्रयत्न करू."या कार्यक्रमाकरिता डॉ सुदर्शन आहिरे, श्री सोयाब सय्यद यांनी विशेष सहकार्य लाभले.यावेळी इगतपुरी कर्णबधिर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती शितल मराठे, विशेष शिक्षक चेतन सोनार, महेश बगणर अनिल मराठे ,रुपाली कडू आणि अमोल पाटील तसेच मखमलाबाद विद्यालयाचे प्रदिप निकम आणि समाधान पाटील आदी उपस्थित होते.

यावेळी समाजातील तरुण वर्गास सामाजिक बांधिलकी ची माहिती व्हावी या उद्देशानेव्हि. के. टी. कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय दे.कॅम्पचे मानसशास्त्र विषयाचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थीचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. कु विद्या। देशमुख, कु रुची सारडा कु नेहा मुंगतोडे ,कु प्रभंजन कुलकर्णी त्यांनी सात वर्गांना वॉल क्लॉक्स भेट दिले. संस्थेचे हितचिंतक श्री शांतीलालजी अलझाड यांचे वतीने जिलबी वाटप करण्यात आले. श्रीमती दास यांनी सूत्रसंचालन केले तर संस्थेचे खजिनदार श्री दिपक मगर यांनी कंपनीने 1 कोटी रुपयांचे आर्थिक योगदान दिल्यामुळे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. मूकबधिर साइन लँग्वेज ने राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहमय वातावरणात संपन्न

महाराष्ट्र जीत

**प्रदीप पोटफोडे/पाचोड :** शिवछत्रपती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. "रंग क्रीडेचे, ताल संस्कृतीचे" ही यंदाच्या युवक महोत्सवाची आकर्षक थीम होती. क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांचा सुंदर संगम साधत विद्यार्थ्यांनी आपली कला, कौशल्ये आणि सर्जनशीलता प्रभावीपणे सादर केली.या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून जि.प. सदस्य शिवराज भुमरे यांची उपस्थिती लाभली. मार्गदर्शक म्हणून माजी आयुक्त सुभाष भवर तसेच नाट्यकालावंत डॉ.चंद्रकांत जोगदंड उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे होते.यावेळी सुभाष भवर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा प्रभावीपणे कशा हाताळाव्यात, नियोजनबद्ध अभ्यासाचे महत्त्व आणि यश संपादनासाठी आवश्यक असलेली चिकाटी याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.स्वप्न मोठे ठेवा आणि त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करा असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.नाट्यकालावंत डॉ. चंद्रकांत जोगदंड यांनी विविध नाटकांतील गाजलेल्या व्यक्तिरेखांचा अभिनय सादर



करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या प्रभावी अभिनयामुळे सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला आणि विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित झाला.अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आगामी विद्यापीठ परीक्षांसाठी शुभेच्छा देत शैक्षणिक प्रगतीसोबतच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करण्याचे आवाहन केले.याप्रसंगी क्रीडा विभागांतर्गत विविध स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या संघ व विद्यार्थ्यांना चषक, प्रमाणपत्रे व मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच सांस्कृतिक विभागांतर्गत विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व चषक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ह. सो. बिडवे यांनी केले आभार डॉ.संतोष चव्हाण यांनी मानले यावेळी उपप्राचार्य डॉ.शिवाजी यादव क्रीडा विभाग संचालक डॉ.सुरेश नलावडे सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. उत्तम जाधव डॉ.सुभाष पोटभरे डॉ. विलास महाजन डॉ.तुकाराम गावंडे डॉ.भगवान जायभाय डॉ. गांधी बानायत डॉ.हेमंत कुमार जैन प्रा. विनोद कांबळे प्रा.संदीप सातोणकर प्रा.सचिन कदम प्रा.अरुणा दसपुते डॉ.विठ्ठल देखणे प्रा.नितीन चित्ते व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते संपूर्ण कार्यक्रम उत्साह, जल्लोष आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.